# एक कोटीहून अधिक नागरिकांची ‘सिकलसेल’ आजाराची तपासणी

आरोग्य वार्ता

**पीटीआय, नवी दिल्ली**

**राष्ट्रीय ‘सिकलसेल** ॲनिमिया’ निर्मूलन मोहिमेंतर्गत मागील वर्षभरात एक कोटीहून अधिक नागरिकांची ‘सिकलसेल’ आजाराची तपासणी करण्यात आली आहे, असे एका अधिकाऱ्याने मंगळवारी सांगितले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मागील वर्षी जुलैमध्ये राष्ट्रीय ‘सिकलसेल ॲनिमिया’ निर्मूलन मोहिमेचा प्रारंभ केला होता. ‘सिकलसेल’ हा एक आनुवंशिक रक्त रोग असून, तो बाधित रुग्णाच्या संपूर्ण आयुष्यावर परिणाम करतो. देशातील आदिवासी भागातील नागरिकांमध्ये हा आजार सामान्यतः आढळून येतो. परंतु, बिगर आदिवासी नागरिकांनाही हा आजार झाल्याचे पाहायला मिळते. त्यामुळे देशातून २०४७ पर्यंत या आजाराचे निर्मूलन करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. गुजरात, महाराष्ट्र, राजस्थान, मध्य प्रदेश, झारखंड, छत्तीसगड, पश्चिम बंगाल, ओडिशा, तमिळनाडू, तेलंगणा, आंध्र प्रदेश, कर्नाटक, आसाम, उत्तर प्रदेश, केरळ, बिहार आणि उत्तराखंड या १७ राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर या आजाराचे रुग्ण आहेत. त्यामुळे या राज्यांतील २७८ जिल्ह्यांवर लक्ष केंद्रित करून आजाराचे निर्मूलन करण्यावर भर देण्यात आला आहे.

या मोहिमेत शून्य ते ४० वर्षे वयोगटातील सात कोटी नागरिकांची सिकलसेल आजाराची तपासणी, तसेच विवाहपूर्व आणि गर्भधारणापूर्व समुपदेशन केले जाणार आहे. त्याचबरोबर हा आजार असलेल्या नागरिकांवर आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून उपचार केले जाणार आहेत, असे या अधिकाऱ्याने पुढे सांगितले.











# रब्बीच्या पेरण्या अकरा टक्क्यांनी घटल्या

## अपुऱ्या पावसाचा परिणाम

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** यंदाच्या रब्बी हंगामातील पेरण्यांमध्ये अकरा टक्क्यांनी घट झाली आहे. राज्यातील रब्बीचे क्षेत्र सरासरी ५४ लाख हेक्टरच्या घरात आहे. मागील वर्षी ५४.६४ लाख हेक्टरवर पेरण्या झाल्या आहेत. यंदा एक डिसेंबरअखेर ४८.६५ लाख हेक्टरवर पेरण्या झाल्या आहेत. मागील वर्षीच्या तुलनेत यंदा अकरा टक्क्यांनी घट होऊन रब्बी पेरण्या ८९ टक्क्यांवर स्थिरावल्या आहेत.

कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात यंदा अपुरा पाऊस झाला आहे. विहिरी, कूपनलिकांना पुरेसे पाणी नाही. धरणांमध्ये पुरेसे पाणी नसल्यामुळे रब्बी हंगामातील पिकांना पुरेसे आवर्तन मिळण्याची शक्यता नाही, त्यामुळे राज्यात रब्बी हंगामातील पेरण्या मागील वर्षाच्या तुलनेत ८९ टक्क्यांवर स्थिरावल्या आहेत.

राज्यात रब्बी हंगामाचे सरासरी क्षेत्र ५३ लाख ९६ हजार ९६९ हेक्टर आहे. मागील वर्षी पाण्याची उपलब्धता चांगली असल्यामुळे ५४ लाख ६४ हजार ७१६ हेक्टरवर पेरण्या झाल्या होत्या. यंदा एक डिसेंबरअखेर ४८ लाख ६५ हजार ३२० हेक्टरवर पेरण्या झाल्या आहेत. यंदाच्या पेरण्या मागील पाच वर्षांच्या सरासरीच्या तुलनेत ९०.१५ टक्के आणि मागील वर्षाच्या तुलनेत ८९ टक्के झाल्या आहेत. राज्यात रब्बी हंगामात ऊसतोडणीनंतर जानेवारीअखेरपर्यंत पेरण्या होतात. पण, यंदा पाण्याची उपलब्धता कमी असल्यामुळे आता पेरण्यांचा टक्का फारसा वाढण्याची शक्यता नाही.



### ज्वारी, करडईचा पेरा वाढला

- मागील हंगामाच्या तुलनेत यंदा रब्बी हंगामात ज्वारीची पेरणी १०९ टक्क्यांवर गेली असून, राज्यभरात १३ लाख ६४ हजार ३८७ हेक्टरवर पेरणी झाली आहे.
- करडईची पेरणी १२७ टक्क्यांवर गेली असून, ३८ हजार ३४५ हेक्टरवर पेरा झाला आहे.
- गव्हाची ७८ टक्के, मक्याची ८१ टक्के, इतर तृणधान्यांची ७९ टक्के, कडधान्यांची ७० टक्के तर करडईचा पेरा वाढल्यामुळे तेलबियांच्या पेरण्या ९८ टक्क्यांवर गेल्या आहेत.

> अपुऱ्या पावसामुळे राज्यभरात रब्बी हंगामासाठी पाण्याची उपलब्धता कमी आहे. परिणामी पेरण्यांमध्ये घट झाली आहे. कमी पाण्यावर येणाऱ्या ज्वारी आणि करडई पिकाला शेतकऱ्यांनी प्राधान्य दिले आहे.
> – दिलीप झेंडे, संचालक, विकास आणि प्रशिक्षण

# अवैध विद्युत प्रवाह वन्यजीवांकरिता कर्दनकाळ!

## पूर्व विदर्भात व्यवस्थापनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह



**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नागपूर :** वीजप्रवाह हा वन्यप्राण्यांसाठी सर्वात मोठा धोका असतानादेखील ही बाब गांभीर्याने घेतली जात नाही. आतापर्यंत वाघ, बिबट व इतर तृणभक्षी प्राण्यांचे यात बळी जात होते. मात्र, गेल्या तीन महिन्यात परराज्यातून आलेल्या दोन रानटी हत्तींचा यात बळी गेल्याने व्यवस्थापनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पूर्व विदर्भातील गडचिरोली व गोंदिया जिल्ह्यातील जंगलात प्रवेश करून गेल्या दीड वर्षांपासून परराज्यातील रानटी हत्ती त्यांचे क्षेत्र प्रस्थापित करत आहेत. ऑक्टोबर महिन्यात सिंदेवाही तालुक्यात वीजप्रवाहामुळे रानटी हत्तीचा मृत्यू झाला. तर आता वर्षाच्या सुरुवातीलाच दुसऱ्या हत्तीचा देखील वीजप्रवाहाने मृत्यू झाला. हे दोन्ही मृत्यू शेताभोवतालच्या कुंपणावर सोडलेल्या वीजप्रवाहामुळे झाले आहेत. वनखात्याकडून ‘फास्ट ट्रॅक’ आधारावर एक महिन्यात पीक नुकसान भरपाई देण्याचे नियोजन आहे. त्यानंतरही शेतकरी शेतीच्या कुंपणावर वीजप्रवाह सोडत आहेत. वाघ, बिबट व इतर तृणभक्षी प्राणी आतापर्यंत वीजप्रवाहाला बळी ठरत होते. जिल्हा व्याघ्र कक्ष समितीत वनखाते, महावितरण, सिंचन, रेल्वे या विभागातील अधिकारी सहभागी असतात. रेल्वे अपघात, वीजप्रवाह, कालवा यामुळे होणारे वन्यप्राण्यांचे मृत्यू कसे रोखता येईल, या दृष्टीने बैठकीत चर्चा होऊन उपाय शोधले जातात. दर तीन महिन्यांनी या समितीच्या बैठका होणे अपेक्षित असताना त्यात सातत्य नाही. बैठक झाली तरीही त्यात झालेल्या चर्चेनंतर शोधलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे वीजप्रवाहावर आजतागायत तोडगा निघाला नाही. वाघ, बिबट व इतर वन्यप्राण्यांच्या वीजप्रवाहामुळे झालेल्या मृत्यूच्या ८० टक्के घटना उघडकीस येत नाही. मात्र, हत्तीचा मृत्यू लपवता येत नाही. हत्ती त्याच्या आकार आणि स्वभावानुसार जंगल क्षेत्रात फिरताना गावशेती परिसराचा वापर करतात. यात मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान होते.

सध्या खरीप धान पिकांमध्ये कमी कालावधीच्या पिकांची कापणी झाली असून जास्त कालावधीच्या धान पिकांची कापणी सुरू आहे. तसेच रब्बी पिकांसाठी खार पेरणी सुरू आहे. तसेच कापणी झालेले धान काही ठिकाणी चुरणीसाठी ठेवले आहे. वन्यप्राण्यांनी हे धानपीक नष्ट करू नये यासाठी ठराविक ठिकाणी वीजप्रवाह सोडला जात असून त्यातच ही घटना झाली आहे. हे मृत्यू रोखायचे असतील तर ‘मिशन मोड’वर काम करण्याशिवाय पर्याय नाही.

> वीजप्रवाहाच्या ८० टक्के घटना उघडकीस येत नाहीत, हे वास्तव आहे. या वेगाने वन्यप्राण्यांचे मृत्यू होत राहिल्यास आपण वाघच काय, पण हत्ती देखील वाचवू शकणार नाही. वीजप्रवाहविरोधी मोहिमेची कमतरता, जनजागृतीची कमतरता, वेळेत नुकसान भरपाई मिळत नसल्याने जंगलालगतच्या गावकऱ्यांचा आक्रोश यामुळे केवळ बदला घेण्याच्या उद्देशाने स्थानिकांकडून वीजप्रवाहाचा वापर केला जात आहे.
> – सावन बाहेकर, मानद वन्यजीव रक्षक गोंदिया व अध्यक्ष, सेवा संस्था

# महिलेचा पतीविरुद्धच ‘ॲट्रॉसिटी’चा खटला

## पंढरपुरात घडला राज्यातील पहिलाच प्रकार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**सोलापूर :** मागासवर्गीय समाजाच्या व्यक्तीस जातीवाचक शिवीगाळ करून हीन वागणूक दिल्यावर सवर्ण जातीच्या व्यक्तीविरुध्द ‘ॲट्रॉसिटी’ (दलित अत्याचार विरोधी कायदा) कायद्याखाली फिर्याद दाखल होण्याचे प्रकार नवीन नाहीत. परंतु एका महिलेने आपल्याच नवऱ्याविरुद्ध या ‘ॲट्रॉसिटी’ कायद्याखाली तक्रार नोंदविण्याचा प्रकार पंढरपुरात घडला आहे. या प्रकरणात संबंधित नवऱ्यास अटकही झाली आहे. पत्नीकडून पतीवर ‘ॲट्रॉसिटी’ दाखल करण्याची ही राज्यातील पहिलीच घटना असल्याचे मानले जात आहे.

या अनोख्या खटल्याची माहिती अशी, की फिर्यादी व आरोपी यांचा आंतरजातीय विवाह झाला होता. फिर्यादी दलित समाजातील तर आरोपी सवर्ण समाजातील आहेत. त्यांना दोन मुलीही आहेत. परंतु अलीकडे काही दिवसांपासून नवऱ्याकडून आपणांस जातीवरून अपमानास्पद आणि हीन वागणूक दिली जाते. नवऱ्याने आपल्या इच्छेविरुध्द लैंगिक अत्याचारही केला, अशी फिर्याद पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाण्यात पीडित पत्नीने नोंदविली. त्यानुसार नवऱ्याविरुद्ध ‘ॲट्रॉसिटी’सह अन्य कलमान्वये गुन्हा दाखल झाला आहे. याप्रकरणी पतीस अटक करून त्याची रवानगी कोठडीत करण्यात आली आहे.



दरम्यान, आरोपीने पंढरपूर न्यायालयात ज्येष्ठ फौजदारी वकील धनंजय माने यांच्यामार्फत जामीन अर्ज दाखल केला आहे. लग्न झाल्यानंतर बायको माझ्या जातीची झाली आहे, त्यामुळे ती आता ‘ॲट्रॉसिटी’ कायद्याने गुन्हा दाखल करू शकत नाही, असे या जामीन अर्जात नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी आरोपीतर्फे ॲड. धनंजय माने यांना ॲड. जयदीप माने, ॲड. सिद्धेश्वर खंडागळे, ॲड. सुहास कदम व ॲड वैभव सुतार हे मदत करीत आहेत. तर सरकारतर्फे ॲड. आनंद गोरे काम पाहात आहेत. पतीविरुद्ध पत्नीने ‘ॲट्रॉसिटी’ कायद्याखाली खटला दाखल करण्याची न्यायालयीन इतिहासातील ही पहिलीच घटना असल्याचे बोलले जात आहे.

# आरोग्य सहसंचालकांची उचलबांगडी

## ज्येष्ठताक्रम डावलून दिलेला पदभार सरकारने काढला

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**पुणे :** राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागावर भ्रष्टाचाराचे आरोप ठाकरे गटाचे नेते व खासदार संजय राऊत यांनी केले होते. अनेक कनिष्ठ अधिकाऱ्यांची पैसे घेऊन वरिष्ठपदी वर्णी लावण्यात आल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला होता. आरोग्य सेवा सहसंचालक डॉ. प्रतापसिंह सारणीकर यांचेही नाव या यादीत होते. यामुळे अखेर राज्य सरकारने सारणीकर यांची उचलबांगडी करून सहसंचालक पदाचा अतिरिक्त पदभार डॉ. आर. बी. पवार यांच्याकडे सोपविला आहे.

राऊत यांनी मागील महिन्यात सार्वजनिक आरोग्य विभागावर आरोप केले होते. डॉ. प्रतापसिंह सारणीकर हे जिल्हा आरोग्य अधिकारी या यादीत १११ क्रमांकावर आहेत. उपसंचालक यादीत त्यांचे नाव नसतानाही त्यांची दोन टप्पे ओलांडून सहसंचालकपदी नियुक्ती करणे धक्कादायक असून यामागे



अर्थकारण आहे, असा थेट आरोपही राऊत यांनी केला होता. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत १४ उपसंचालकांची निवड झाली, परंतु त्यांच्याकडे नियुक्तीसाठी प्रत्येकी ५० लाखांची मागणी करण्यात आली. ही मागणी पूर्ण न झाल्याने त्यांना अडगळीच्या ठिकाणी नियुक्ती देण्यात आली. त्यांच्याकडे नियुक्तीसाठी पैशांची मागणी अद्याप सुरू आहे, असेही राऊत म्हणाले होते.

राऊत यांच्या आरोपानंतर सार्वजनिक आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी डॉ. सारणीकर यांची सहसंचालक पदावरून उचलबांगडी केली. ते आता त्यांच्या सहायक संचालकपदाच्या मूळ जागी रुजू झाले आहेत. हिवताप व जलजन्य आजार विभागाची जबाबदारी त्यांच्यावर आहे. त्यांच्या बदलीचा आदेश सोमवारी (ता.१) सायंकाळी काढण्यात आला. डॉ.सारणीकर यांच्या जागी ज्येष्ठताक्रमानुसार आरोग्य उपसंचालक डॉ. आर. बी. पवार यांची नियुक्ती करण्याचा आदेशही काढण्यात आला आहे. डॉ. पवार यांच्याकडे हा अतिरिक्त पदभार सोपविण्यात आला आहे.

### इतर अधिकाऱ्यांचे काय होणार?

**आरोग्य विभागातील अनियमित पदभाराचा मुद्दा वारंवार उपस्थित होत आहे. अनेक पात्र अधिकाऱ्यांना डावलून कनिष्ठ अधिकाऱ्यांना वरिष्ठ पदी नियुक्ती देण्यात आली आहे. त्यामुळे कनिष्ठ अधिकाऱ्यांच्या हाताखाली काम करण्याची वेळ वरिष्ठ अधिकाऱ्यांवर आली आहे. आता अशा प्रकारे चुकीच्या पद्धतीने पदभार सोपविलेल्या अधिकाऱ्यांची उचलबांगडी होणार का, अशी चर्चा आरोग्य विभागात सुरू आहे.**

# वरठीच्या सनफ्लॅग कंपनीत स्फोट

## कामगार होरपळले

**लोकसत्ता वार्ताहर**

**भंडारा :** शहराजवळील वरठी येथे असलेल्या सनफ्लॅग आयर्न ॲन्ड स्टील कंपनीत मंगळवारी पहाटे सव्वातीनच्या सुमारास स्फोट झाला. या स्फोटात तीन कामगार होरपळले. त्यांना नागपूर येथील खासगी रुग्णालयात लवण्यात आले. घटनेच्यावेळी कंपनीत काम करणाऱ्या आणखी आठ कामगारांनाही दुखापत झाली. त्यांच्यावर प्राथमिक उपचार करण्यात आले.

कंपनीतील एसएमएस या विभागातील एलएचएफ युनिटमध्ये ही घटना घडली. दुर्घटनेमागील मूळ कारण अद्याप अस्पष्ट आहे. हिटिंग फरनेसमध्ये अचानक मोठा स्फोट झाल्याचे कामगारांनी सांगितले. जखमींमध्ये तंत्रज्ञ नामदेव झंझाड, अभियंता सागर गभने व कंत्राटी कामगार हटवार यांचा समावेश आहे. त्यांना नागपूर येथे हलवण्यात आले असून त्यांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याची माहिती व्यवस्थापनाने दिली. स्फोट एवढा प्रचंड होता की कंपनीच्या जवळपास असलेला परिसरही हादरला. या अपघातात कंपनीतील साहित्याचेही मोठे नुकसान झाले. सुदैवाने प्राणहानी झाली नाही.

# इचलकरंजीत रविवारपासून आंतरराष्ट्रीय वस्त्रोद्योग यंत्रसामग्रीचे प्रदर्शन

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** इचलकरंजीतील वस्त्रोद्योगास चालना मिळावी व अत्याधुनिक तंत्रज्ञानाची माहिती वस्त्रोद्योजकांना मिळावी यासाठी ‘टेक्सपोजर - २०२४’ या टेक्सटाईल मशिनरी प्रदर्शनाचे आयोजन ७ ते १० जानेवारी रोजी केले आहे. या प्रदर्शनात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील सुमारे २२० नामवंत कंपन्यांच्या स्टॉलचा सहभाग असून, देशभरातून वस्त्रोद्योजक भेट देणार आहेत. तसेच जपान, जर्मनी, स्वित्झर्लंड, इटली, बेल्जिअम, चीन आदी देशांतील तज्ज्ञ मंडळी भेट देणार आहेत.

रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी सेंट्रल आणि डीकेटीई सोसायटीचे टेक्स्टाईल ॲण्ड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमाचे उद्‌घाटन खासदार धैर्यशील माने, आमदार प्रकाश आवाडे, टेक्स्टाईल कमिशनर श्रीमती रूप राशी यांच्या हस्ते होणार आहे. इचलकरंजी महानगरपालिकेचे आयुक्त ओमप्रकाश दिवटे, माजी आमदार सुरेश हाळवणकर, रोटरी प्रांतपाल नासिर बोरसदवाला, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या प्रदर्शनास वस्त्रोद्योग मंत्री चंद्रकांत पाटील भेट देणार आहेत, अशी माहिती डीकेटीईच्या मानद सचिव डॉ सपना आवाडे, रोटरी मानव सेवा ट्रस्टचे अध्यक्ष अंबरीश सारडा यांनी मंगळवारी पत्रकारांना दिली.


**SBI State Bank of India**

**स्ट्रेस्ड ॲसेट्स मॅनेजमेंट ब्रँच-II** : रहेजा चेंबर्स, तळमजला, विंग-बी, फ्रि प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०००२१, **टेलि नं. :** ०२२-४१६११४०३, **फॅक्स नं. :** ०२२-२२८११४०३, **ईमेल आयडी :** team7.sbi.15859@sbi.co.in

**परिशिष्ट-IV-ए [ रुल ८(६)च्या तरतुदी पाहा ) ] स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना**

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या रुल ८(६) च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना स्टेट बँक ऑफ इंडियाचे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी सरफेसी ॲक्टच्या सेक्शन १३(४) अंतर्गत खालील मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेतला आहे. आम जनतेस कळविण्यात येते की, बँकेच्या देणींच्या वसुलीकरिता याखालील नमूद केलेल्या प्रकरणातील ताबा घेतलेल्या मालमत्तेच्या ई-लिलावाचे आयोजन (सरफेसी ॲक्ट, २००२ अंतर्गत) "जसे आहे जेथे आहे, "जसे आहे जे काही आहे" व "जे काही आहे तेथे आहे" या तत्त्वावर आणि याखालील विनिर्दिष्ट शर्ती व अटींवर करण्यात येणार आहे.

| ऋणकोचे नाव | हमीदाराचे नाव | थकीत देणींची वसुली, ज्याकरिता मालमत्तेची विक्री करण्यात येत आहे |
|---|---|---|
| **मेसर्स केतन शाह इंडस्ट्रिज एलएलपी**, २३२, सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क, अंधेरी घाटकोपर लिंक रोड, अंधेरी (पू), मुंबई-४०००९३. **श्री. केतन विनोदकुमार शाह व श्रीमती राधिका केतन शाह**, फ्लॅट नं. १०१, पहिला मजला, भूमी बिल्डिंग, नुतन लक्ष्मी सीएचएस, प्लॉट नं. ७९, एन एस रोड नं. ०८, जेव्हीपीडी, विलेपार्ले (प), मुंबई-४०० ०५७. | १. श्री. केतन विनोदकुमार शाह (भागीदार) २. श्रीमती राधिका केतन शाह (भागीदार) | रु. २३,०९,४४,६९५.०० (रुपये तेवीस कोटी नऊ लाख चव्वेचाळीस हजार सहाशे पंचाणव फक्त) ०३.०३.२०१५ रोजीप्रमाणे अधिक बँकेला अंतिम प्रदान केलेल्या तारखेपर्यंत वजा वसुली व आनुषंगिक खर्च, किंमत, आकार, इ.सह एकत्रित संविदात्मक दरातील निघालेले व्याज/वसुली केलेले व्याज (१३(२) सूचनेनुसार थकीत रक्कम) |

| युनिटचे नाव | मालमत्तेचे वर्णन | ई-लिलावाची तारीख व वेळ : | राखीव किंमत/ इरठे/ बोली वृद्धी रक्कम |
|---|---|---|---|
| **मेसर्स केतन शाह इंडस्ट्रिज एलएलपी** | जमीन व बांधकाम सीटीएस नं. ४०१६, ४०१७ व २८९४ वरील (एकत्रीकृत) एकूण एरिया अदमासे मोजमापाचा २३२३.१० चौ.मी., तलरेजानगर, मिशन हॉस्पिटलजवळ, जालना-४३१ २०३, मेसर्स केतन शाह इंडस्ट्रिज एलएलपीच्या नावे असलेली (**सांकेतिक ताबा** अंतर्गत) | **तारीख :- १९.०१.२०२४ वेळ :- स. ११.०० ते दु. ०४.०० प्रत्येकी १० मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह** | **राखीव किंमत रु. ५.५९ कोटी त्याखाली मालमत्तेची विक्री केली जाणार नाही.** **इसारा रक्कम ठेव (इरठे) राखीव किमतीच्या १०% म्हणजेच रु. ५५.९० लाख** **बोली वृद्धी रक्कम :- रु. १,००,०००/-** |

**इरठे व सहभागाचे विनंतीपत्र / केवायसी कागदपत्रे / इरठेचा पुरावा, इ.च्या सादरीकरणाकरिता तारीख व वेळ १८.०१.२०२४ रोजी दु. ०४.३० वा. किंवा तत्पूर्वी**

**पाहाणीची तारीख व वेळ**

**तारीख :- १२.०१.२०२४, वेळ :- स. ११.०० ते दु. ०४.०० संपर्क व्यक्ती :- प्रकाश जोशी, मोबा.- ७५५८३ ७२८५०**

* **लक्ष द्यावे** : नोंद घेण्यात यावी की, या ई-लिलावाचे आयोजन "जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे काही आहे" व "जे काही आहे तेथे आहे" या तत्वावर करण्यात येत आहे. विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता, कृपया स्टेट बँक ऑफ इंडिया, सुरक्षित धनकोच्या **www.sbi.co.in व https://www.mstcecommerce.com/auctionhome/ ibabi/index.jsp** या वेबसाइटवर तरतूद केलेली लिंक पाहावी.

मालमत्तेची विक्रि सर्व विद्यमान व भावी भारांसह, जे बँकेला ज्ञात आहेत किंवा ज्ञात नाहीत, करण्यात येत आहे. प्राधिकृत अधिकारी / सुरक्षित धनको कोणत्याही त्रयस्थ पक्षकाराचे दावे / हक्क / देणी याकरिता कोणत्याही स्थितीत जबाबदार असणार नाहीत.

विक्री सिक्युरिटायझेशन अँड रिकन्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत विहित नियम / अटींच्या विषयाधीन असणार आहे. ऋणको / हमीदारांना याद्वारा अधिसूचीत करण्यात येते की, मालमत्तेचा लिलाव करण्यात येणार आहे आणि उर्वरित रक्कम, जर असल्यास, तुमच्याकडून व्याज व किमतीसह वसूल करण्यात येईल.

विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता, कृपया स्टेट बँक ऑफ इंडिया, सुरक्षित धनकोच्या **www.sbi.co.in व https://www.mstcecommerce.com/auctionhome/ibabi/index.jsp** या वेबसाइटवर तरतूद केलेली लिंक पाहावी.

| बँक वेबसाइट www.sbi.co.in | ई-ऑक्शन वेबसाइट | मालमत्ता / ठिकाण | मालमत्तेचा व्हिडीओ/ फोटोज | यूएसपी |
|---|---|---|---|---|

दिनांक : ०२.०१.२०२४, स्थळ : मुंबई

मालमत्ता आयडी नं. :- एसबीआयएन०७७३००१४८०२६ (लॉट-I)

स्वाक्षरी/-
प्राधिकृत अधिकारी, स्टेट बँक ऑफ इंडिया



**OMKARA ASSETS RECONSTRUCTION Pvt. Ltd.**

**ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड**

**नोंदणीकृत कार्यालय :** ९, एम. पी. नगर, फर्स्ट स्ट्रीट, कोंगू नगर एक्स्टेन्शन, तिरुपूर-६४१ ६०७. फोन नं. ०४२१२२२११४४
**कॉर्पोरेट कार्यालय :** कोहिनूर स्क्वेअर, ४७वा मजला, एन. सी. केळकर मार्ग, आर. जी. गडकरी चौक, दादर (पश्चिम), मुंबई-४०० ०२८. **टेलि :** ०२२-२६५४४०००

**[परिशिष्ट - IV - ए] [रुल ८(६)च्या तरतुदी पाहा]**

**स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलावासंबंधित जाहीर सूचना**

**ई-लिलावाची तारीख : २२ जानेवारी, २०२४**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ८(६)च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना**

आम जनतेस आणि विशेषकरून ऋणको/ हमीदार/ गहाणकार यांना याद्वारा सूचना देण्यात आली आहे की, याखाली वर्णिलेली स्थावर मालमत्ता (सुरक्षित मत्ता) सुरक्षित धनकोकडे, म्हणजेच ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेडकडे (ओएआरपीएल), जी कंपन्या अधिनियम, १९५६च्या तरतुदींअंतर्गत एक विधि संस्थापित कंपनी आहे आणि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (२००२चा ५४) (‘‘सरफेसी ॲक्ट, २००२’’)च्या सेक्शन ३ अंतर्गत ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी म्हणून रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (‘‘आरबीआय’’)कडे यथोचितरीत्या नोंदणीकृत आहे; असलेला सीआयएन नं.: यू६७१००टीझेड२०१४पीटीसी०२०३६३ आणि तिचे नोंदणीकृत कार्यालय- ९, एम. पी. नगर, फर्स्ट स्ट्रीट, कोंगू नगर एक्स्टेन्शन, तिरुपूर-६४१ ६०७ आणि कॉर्पोरेट कार्यालय- कोहिनूर स्क्वेअर, ४७वा मजला, एन. सी. केळकर मार्ग, आर. जी. गडकरी चौक, दादर (पश्चिम), मुंबई-४०० ०२८, ओमकारा पीएस-२६/२०२१-२२ ट्रस्टचे विश्वस्त म्हणून तिच्या क्षमतेत कार्यरत असलेली, गहाण आहे/ ताब्यात आहे. तिने दिनांकित ३०.०९.२०२१ अभिहस्तांकन करारनाम्याद्वारे सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२च्या सेक्शन ५ अंतर्गत पूनावाला हाऊसिंग फायनान्स लि.कडून (पीएचएफएल) (पूर्वीची मॅग्मा हाऊसिंग फायनान्स लि. म्हणून ज्ञात असलेली) खालील नमूद केलेल्या प्रतिभूतींसह ऋणको/ सह-ऋणको/ गहाणकारांच्या संपूर्ण थकीत रकमेचे सर्व हक्क, नामाधिकार व हित प्राप्त केले आहेत.

याअधिक, सुरक्षित मत्तेचा प्रत्यक्ष ताबा सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकारींद्वारा घेण्यात आला आहे आणि उक्त मत्तेची विक्री याखाली नमूद केलेल्या ऋणको/ हमीदार/ गहाणकारांकडून सुरक्षित धनकोकरिता याखाली नमूद केलेल्या देय देणींच्या वसुलीकरिता, याखाली नमूद केलेल्या तारखेदिवशी ‘‘जसे आहे जेथे आहे’’, ‘‘जसे आहे जे काही आहे’’ आणि ‘‘जे काही आहे तेथे आहे’’ या तत्त्वावर करण्यात येणार आहे. राखीव किंमत व इसारा रक्कम ठेव (इरठे) व अन्य तपशील याखाली नमूद करण्यात आला आहे.

| ऋणको व सह-ऋणकोची नावे | थकीत रक्कम (रु.त) | मागणी सूचनेची तारीख | प्रत्यक्ष ताब्याची तारीख |
|---|---|---|---|
| **१. संदीप कालू बंकर** (ऋणको/ गहाणकार) **२. बंकर राहुल कालूजी** (सह-ऋणको) **३. सुनिता राहुल बंकर** (सह-ऋणको/ गहाणकार) | **रु. ७,८०,३७८/-** (रुपये सात लाख ऐंशी हजार तीनशे अठ्ठ्याहत्तर फक्त) २५.०६.२०२१ रोजीप्रमाणे अधिक प्रदानाच्या तारखेपर्यंत आनुषंगिक खर्च, किंमत, आकार इ.सह एकत्रित संविदात्मक दरात, त्यावरील निघालेले व्याज/ वसूल न झालेले व्याज. | **२५.०६.२०२१** | **१८.०७.२०२३** |

| मालमत्तेचे वर्णन | राखीव किंमत | इरठे |
|---|---|---|
| टेनेमेन्ट नं. १०३, बिल्डिंग नं. ई-१३, पहिला मजला, गट नं. ०९, नक्षत्रवाडी, जि. औरंगाबाद-४३१ ००१. मोजमापाची ४५१ चौ.फू. | **रु. ९,३५,०००/-** | **रु. ९३,५००/-** |

| | |
|---|---|
| **पाहणीची तारीख व वेळ** | तारीख : १८.०१.२०२४, वेळ : दु. ०१.०० ते दु. ०४.०० |
| **लिलावाची तारीख व वेळ** | तारीख : २२.०१.२०२४, वेळ : दु. ०३.०० ते सायं. ०५.०० |
| **इरठेचे प्रदान व बोली प्रपत्रांच्या सादरीकरणाकरिता शेवटची तारीख** | तारीख : २०.०१.२०२४, रोजी सायं. ०६.०० वा.पर्यंत |
| **वृद्धी मूल्य** | **रु. १०,०००/-** |

१. ज्या स्वारस्य असलेल्या बोलीदारांनी इरठे भरलेली आहे आणि लॉग-इन आयडी व पासवर्ड निर्मिती, अपलोडिंग डेटा, बोलीचे सादरीकरण, ई-बोली प्रक्रियेवरील प्रशिक्षण इ.बाबतीत त्यांना साहाय्य हवे असल्यास ते संपर्क साधू शकतील : ई-लिलाव सेवा-पुरवठाकार ‘‘मेसर्स सी१ इंडिया प्रा. लि.’’, टेलि. हेल्पलाइन : +९१-७२९१९८११२४/ २५/२६, हेल्पलाइन ई-मेल आयडी : **support@bankeauctions.com** किंवा श्री. भाविक पांड्या, मोबा. : ८८६६६ ८२९३७, ई-मेल : **maharashtra@c1india.com**

२. मालमत्तेसंबंधित कोणत्याही शंका किंवा मालमत्ता पाहणी वेळापत्रक याकरिता, स्वारस्य असलेली व्यक्ती संबंधित प्राधिकृत अधिकारी- आशिष नांगिया (मोबा. : ८५९१४ ३९५५८), ई-मेल : **ashish.nangia@omkaraarc.com** किंवा कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत वर नमूद केलेल्या पत्त्यावर संपर्क साधू शकेल. **विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता, कृपया http://omkaraarc.com/auction.php यावर तरतूद केलेली लिंक पाहावी.**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ८(६) व ९(१) अंतर्गत विक्रीकरिता सांविधिक सूचना**

ही सूचना किंमत व खर्च यासह यावर नमूद केल्यानुसार थकीत देणींच्या प्रदानाद्वारा, मत्तेच्या विमोचनाकरिता, जर ते इच्छुक असल्यास, सल्ल्यासह वरील संदर्भित तारीख व वेळेत जाहीर लिलावाद्वारे विक्रीच्या आयोजनाबाबत त्यांना कळविणारी, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ८(६) व ९(१) आणि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२च्या तरतुदीअंतर्गत वरील कर्ज खात्याचे ऋणको/ सह-ऋणको/ गहाणकारांकरिता तीस दिवसीय (३०) अनिवार्य सूचनासुद्धा आहे. जर प्रदानास कसूर झाल्यास, मालमत्ता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल, २००२च्या रुल ८(५) अंतर्गत विहित असल्यानुसार कोणत्याही प्रकारे विक्री करणे प्राधिकृत अधिकारी/ सुरक्षित धनकोंच्या स्वेच्छाधिकारावर असणार आहे.

**स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी,**
**दिनांक : ०१ जानेवारी, २०२४** **ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रा.लि.करिता**
**स्थळ : मुंबई** (**ओमकारा पीएस२६/२०२१-२२** ट्रस्टचे विश्वस्त म्हणून तिच्या क्षमतेत कार्यरत असलेली)



**शुद्धीपत्रक**

पंजाब नॅशनल बँक, नाशिक यांची ई-लिलाव विक्री नोटीस **मे. हर्षिल कंस्ट्रक्शन कंपनी** या खात्यासंबंधी दिनांक ०२.०१.२०२४ रोजी दै. लोकसत्ता आवृत्तीमध्ये प्रसिद्ध झाली होती. त्यामध्ये नजरचुकीने **श्री. सुभाष खडगी, मुख्य व्यवस्थापक आणि अधिकृत अधिकारी,** असे प्रसिद्ध झाले होते. त्याऐवजी फक्त **श्री. विवेक बोधी मुख्य व्यवस्थापक आणि अधिकृत अधिकारी,** असे वाचण्यात यावे. बाकी नोटीसमध्ये इतर कोणताही बदल नाही.



earc

**एन्कोअर ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी प्रायव्हेट लिमिटेड (एन्कोअर एआरसी)**

ईएआरसी-बँक-०२९-ट्रस्टचे विश्वस्त म्हणून तिच्या क्षमतेत कार्यरत असलेली

**एन्कोअर एआरसी कॉर्पोरेट कार्यालय पत्ता :** ५वा मजला, प्लॉट नं. १३७, सेक्टर-४४, गुरुग्राम-१२२ ००२, हरयाणा.

**शुद्धिपत्र**

कृपया ऋणको, **राजेंद्र नामदेव कसारे** यांच्या स्थावर मालमत्तेच्या ई-लिलावाकरिता जाहीर सूचनेसंबंधित **०१.०१.२०२४** रोजी या वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेली आमची जाहिरात पाहा. ज्यामध्ये विक्रीची तारीख व ऑनलाइन बोलीच्या सादरीकरणाची शेवटची तारीख **१७.०१.२०२४ व १६.०१.२०२४** यानुसार चुकीने प्रसिद्ध झाल्या होत्या. तथापि, लिलावाची तारीख **१९.०१.२०२४** आणि बोलीच्या सादरीकरणाकरिता शेवटची तारीख **१८.०१.२०२४** या अचूक तारखा आहेत. गैरसोयीबद्दल दिलगीर आहोत.

**दिनांक : ०३.०१.२०२४**
**स्थळ : औरंगाबाद**

**स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी**
**एन्कोअर ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी प्रा. लि.**



EXPRESS Careers

**कोचीन शिपयार्ड लिमिटेड**
भारत सरकार की श्रेणी-1 मिनिरत्न कंपनी
पत्तन, पोत परिवहन और जलमार्ग मंत्रालय
**COCHIN SHIPYARD LIMITED**
A Government of India Category-I Miniratna Company
Ministry of Ports, Shipping and Waterways

Ref No. CSL/P&A/RECTT/CMSRU PERMA/Vacancy Notification_Officers/2023/2 03.01.2024

**CSL MUMBAI SHIP REPAIR UNIT (CMSRU) MUMBAI**
**NEEDS OFFICERS ON PERMANENT BASIS**

Cochin Shipyard Limited (CSL), a listed premier Miniratna Company of Government of India, invites **Online applications** for the following posts in CSL Mumbai Ship Repair Unit (CMSRU):-

| Sl. No. | Name of Posts | Number of Vacancies | Qualification & Experience |
|---|---|---|---|
| 1 | Deputy Manager (Electrical) | 1 | Engineering graduates with minimum 60% and Seven years relevant post qualification managerial experience. |
| 2 | Deputy Manager (Weapons) | 1 | |
| 3 | Deputy Manager (Administration) | 1 | MBA / PG Degree / PG Diploma with minimum 60% and Seven years relevant post qualification managerial experience. |
| | Total | 3 | |

For more details on age, reservation, educational qualification, experience, remuneration etc., please read the vacancy notification on CSL website **www.cochinshipyard.in (Career page→CMSRU, Mumbai). Last date of receipt of online application is 31 January 2024.**

“Hindi version of detailed advertisement is published on the website (www.cochinshipyard.in) of CSL.”

Sd/-
GENERAL MANAGER (HR & TRAINING)